भारत सरकार
विधि व न्याय मंत्रालय

# उपदान प्रदान अधिनियम, १९७२

## (सन १९७२ चा अधिनियम क्रमांक ३९)

[दिनांक १ मार्च १९९१ रोजी यथाविद्यमान]

# The Payment of Gratuity Act, 1972

## (Act No. 39 of 1972)

**[ As in force on 1st March 1991 ]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.
१९९२

[किंमत : रुपये ३.३०]

## प्राक्कथन

या आवृत्तीत दिनांक १ मार्च १९९१ रोजी यथाविद्यमान असलेला पेमेंट ऑफ ग्रॅच्युइटी अॅक्ट, १९७२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड २, अंक १, दिनांक २७ मार्च १९९१ यात पृष्ठ ४८ ते ५८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक २७ मार्च १९९१.

व्ही. एस. रमा देवी,
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Payment of Gratuity Act, 1972 as on the 1st March 1991 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 2, dated 27th March, 1991 on pages 48 to 58.

This authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 27th March 1991.

V. S. RAMA DEVI,
Secretary to the Government of India.

कम ४४८१—१

# उपदान प्रदान अधिनियम, १९७२

## कलमांचा क्रम

कलमे


१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रयुक्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

२क. सलग सेवा.

३. नियंत्रक प्राधिकारी.

४. उपदान देणे.

४क. अनिवार्य विमा.

५. सूट देण्याची शक्ती.

६. नामनिर्देशन.

७. उपदानाच्या रकमेचे निर्धारण.

७क. निरीक्षक.

७ख. निरीक्षकांच्या शक्ती.

८. उपदानाची वसुली.

९. शास्ती.

१०. विवक्षित प्रकरणी नियोक्त्यास दायित्वातून सूट.

११. अपराधांची दखल घेणे.

१२. सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण.

१३. उपदानास संरक्षण.

१४. अन्य अधिनियमिती, इत्यादींहून हा अधिनियम अधिभावी ठरणे.

१५. नियम करण्याची शक्ती.

# उपदान प्रदान अधिनियम, १९७२

## (१९७२ चा अधिनियम क्रमांक ३९)

(दिनांक १ मार्च, १९९१ रोजी यथाविद्यमान)

[ २१ ऑगस्ट, १९७२ ]

**कारखाने, खाणी, तेलक्षेत्रे, मळे, बंदरे, रेल्वे कंपन्या, दुकाने किंवा अन्य आस्थापना यांमध्ये कामाला असलेल्या कर्मचाऱ्यांना उपदान देण्याबद्दलच्या योजनेकरता व तिच्याशी निगडित किंवा तिला आनुषंगिक अशा बाबींकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या तेविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव, विस्तार, प्रयुक्ती व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास 'उपदान प्रदान अधिनियम, १९७२' असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे :

परंतु, तो मळ्यांशी किंवा बंदरांशी संबंधित असेल तेवढ्या बाबतीत त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्यावर असणार नाही.

(३) (क्) प्रत्येक कारखाना, खाण, तेलक्षेत्र, मळा, बंदर आणि रेल्वे कंपनी;

(ख्) एखाद्या राज्यामध्ये दुकाने व आस्थापना यांच्यासंबंधात त्या त्या काळी अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या अर्थानुसार असलेल्या ज्या दुकानामध्ये किंवा आस्थापनेमध्ये दहा किंवा अधिक व्यक्ती कामाला लावलेल्या आहेत अथवा मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामाला लावलेल्या होत्या असे प्रत्येक दुकान किंवा आस्थापना;

(ग्) केंद्र शासन याबाबतीत अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा ज्या आस्थापनांमध्ये किंवा अशा ज्या वर्गाच्या आस्थापनांमध्ये दहा किंवा अधिक कर्मचारी कामावर लावलेले आहेत किंवा मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामाला लावलेले होते अशा अन्य आस्थापना किंवा आस्थापनावर्ग,

यांना हा अधिनियम लागू होईल.

[1][(३क) ज्यास हा अधिनियम लागू झाला असेल अशा एखाद्या दुकानात किंवा आस्थापनेत कामावर लावलेल्या व्यक्तींची संख्या, हा अधिनियम अशाप्रकारे लागू झाल्यानंतर कोणत्याही वेळी दहापेक्षा कमी झाली तरीही ते दुकान किंवा ती आस्थापना या अधिनियमाद्वारे नियंत्रित होण्याचे चालू राहील.]

(४) केंद्र शासन अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क्) "समुचित शासन" याचा अर्थ,—

(एक) (क्) केंद्र शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या,
(ख्) एकापेक्षा अधिक राज्यांमध्ये शाखा असलेल्या,
(ग्) केंद्र शासनाच्या मालकीच्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कारखान्यांच्या,
(घ्) मोठे बंदर, खाण, तेलक्षेत्र किंवा रेल्वे कंपनी यांच्या

आस्थापनेच्या संबंधात, केंद्र शासन असा आहे;

(दोन) अन्य कोणत्याही बाबतीत, राज्य शासन असा आहे;

(ख्) "सेवेचे पूर्ण वर्ष" याचा अर्थ, एक वर्षभर केलेली सलग सेवा असा आहे;

[2][(ग्) "सलग सेवा" याचा अर्थ, कलम २क मध्ये व्याख्या दिल्याप्रमाणे असलेली सेवा, असा आहे;]

(घ्) "नियंत्रक प्राधिकारी" याचा अर्थ, कलम ३ खाली समुचित शासनाने नियुक्त केलेला प्राधिकारी असा आहे;

(ङ्) "कर्मचारी" याचा अर्थ, कोणतीही आस्थापना, कारखाना, खाण, तेलक्षेत्र, मळा, बंदर, रेल्वे कंपनी किंवा दुकान यांमध्ये कोणतेही कुशल, अर्धकुशल किंवा अकुशल, अंगमेहनतीचे, पर्यवेक्षी, तंत्रकुशल किंवा कारकुनी स्वरूपाचे काम करण्यास दरमहा जास्तीत जास्त [3][पंचवीसशे रुपये किंवा केंद्र शासन, वेतनांची सर्वसाधारण पातळी लक्षात घेऊन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशी अधिक रक्कम]. इतक्या, वेतनावर कामाला लावलेली (शिकाऊ उमेदवाराहून अन्य) कोणतीही व्यक्ती असा आहे—मग अशा सेवायोजनांच्या अटी व्यक्त असोत वा उपलक्षित असोत—

---

१. १९८४ चा अधिनियम २६, कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला (१८ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (११ फेब्रुवारी १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. १९८७ चा अधि. २२ कलम २ (एक) (क्) द्वारे "सोळाशे रुपये" या शब्दांऐवजी वरील मजकूर घातला (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

¹[आणि अशी व्यक्ती व्यवस्थापकीय किंवा प्रशासकीय हुद्यावर नेमलेली असो वा नसो— मात्र जी व्यक्ती केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या अखत्याराखालील पद धारण करते आणि अन्य कोणत्याही अधिनियमांद्वारे किंवा उपदान प्रदानासाठी उपबंध करणाऱ्या कोणत्याही नियमाद्वारे जिचे नियंत्रण होते अशा कोणत्याही व्यक्तीचा त्यामध्ये समावेश होत नाही.]

**स्पष्टीकरण.**—एखादा कर्मचारी किमान पाच वर्षे इतका काळ ²[खंड (ङ्) द्वारे वा अन्वये तात्पुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या रकमे इतक्या] वेतनावर कामाला राहिला असून त्यानंतर कोणत्याही वेळी दरमहा ³[त्या रकमेपेक्षा] अधिक वेतनावर कामाला राहिला असेल तर, त्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत, असा कर्मचारी ज्या कालावधीमध्ये दरमहा जास्तीत जास्त ³[त्या रकमेपेक्षा] इतक्या वेतनावर कामाला राहिला होता तेवढ्या कालावधीबाबतचे उपदान हे, त्याला त्या कालावधीमध्ये मिळालेल्या वेतनाच्या आधारे निर्धारित करण्यात येईल ;

(च्) "नियोक्ता" याचा कोणतीही आस्थापना, कारखाना, खाण, तेलक्षेत्र, मळा, बंदर, रेल्वे कंपनी किंवा दुकान यांच्यासंबंधातील अर्थ पुढीलप्रमाणे आहे—

(एक) ते केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीचे किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असल्यास, कर्मचाऱ्यांचे पर्यवेक्षण व नियंत्रण यांसाठी समुचित शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती किंवा प्राधिकारी अथवा अशी कोणतीही व्यक्ती किंवा प्राधिकारी नियुक्त केलेला नसेल तेव्हा संबंधित मंत्रालयाचा किंवा विभागाचा प्रमुख,

(दोन) ते कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीचे किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असल्यास, कर्मचाऱ्यांचे पर्यवेक्षण व नियंत्रण यांसाठी अशा प्राधिकरणाने नियुक्त केलेली व्यक्ती अथवा अशी कोणीही व्यक्ती नियुक्त केलेली नसेल तेव्हा त्या स्थानिक प्राधिकरणाचा मुख्य कार्यकारी अधिकारी,

(तीन) अन्य कोणत्याही बाबतीत, आस्थापना, कारखाना, खाण, तेलक्षेत्र, मळा, बंदर, रेल्वे कंपनी किंवा दुकान यांच्या कामकाजावर ज्या व्यक्तीचे किंवा ज्या प्राधिकरणाचे अंतिम नियंत्रण असेल ती व्यक्ती किंवा ते प्राधिकरण, आणि जेथे उक्त कामकाज अन्य कोणत्याही व्यक्तीकडे सोपवलेले असेल तेव्हा ती व्यक्ती—मग ती व्यवस्थापक म्हणून, व्यवस्थापन संचालक म्हणून किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधलेली असो,

(छ) "कारखाना" याला 'कारखाना अधिनियम, १९४८' (१९४८ चा ६३)—कलम २ खंड (ड्) मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे अर्थ आहे;

(ज्) कर्मचाऱ्याच्या संबंधात "कुटुंब" हे पुढील व्यक्ती मिळून बनलेले असल्याचे मानण्यात येईल—

(एक) पुरुष कर्मचाऱ्याच्या बाबतीत, तो स्वतः, त्याची पत्नी, त्याची विवाहित वा अविवाहित अपत्ये, त्याचे परावलंबी मातापिता, आणि ⁴[त्याच्या पत्नीचे परावलंबी मातापिता आणि] त्याच्या अगोदर मृत्यू पावलेला त्याचा एखादा मुलगा असल्यास ⁴[त्याची विधवा] व अपत्ये,

(दोन) स्त्री कर्मचाऱ्याच्या बाबतीत, ती स्वतः, तिचा पती, तिची विवाहित वा अविवाहित अपत्ये, तिचे परावलंबी मातापिता, तिच्या पतीचे परावलंबी मातापिता आणि तिच्या अगोदर मृत्यू पावलेला तिचा एखादा मुलगा असल्यास त्याची विधवा व अपत्ये.

⁵* * * * *

**स्पष्टीकरण.**—जेव्हा एखाद्या कर्मचाऱ्याला एखादे अपत्य दत्तक घेण्याची त्याच्या व्यक्तिगत कायद्यानुसार परवानगी असेल तेव्हा, त्याने विधितः दत्तक घेतलेले कोणतेही अपत्य त्याच्या कुटुंबामध्ये समाविष्ट असल्याचे मानण्यात येईल, आणि जेव्हा एखाद्या कर्मचाऱ्याचे अपत्य अन्य कोणत्याही व्यक्तीने दत्तक घेतलेले असून दत्तक घेणाऱ्या व्यक्तीच्या व्यक्तिगत कायद्याखाली असे दत्तकविधान कायदेशीर असेल तेव्हा, असे अपत्य त्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबामधून वगळले असल्याचे मानण्यात येईल;

(झ्) "मोठे बंदर" याला 'भारतीय बंदर अधिनियम, १९०८' (१९०८ चा १५)—कलम ३, खंड (८) मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे अर्थ आहे;

(ञ्) "खाण" याला 'खाण अधिनियम, १९५२' (१९५२ चा ३५)—कलम २, पोटकलम (१)—खंड (ज्) मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे अर्थ आहे ;

(ट्) "अधिसूचना" याचा अर्थ, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेली अधिसूचना असा आहे;

---

१ सन १९८४ चा अधिनियम २५, कलम २ (क्) (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (दिनांक १२ ऑगस्ट, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९८७ चा अधिनियम २२, कलम २ (ख्) (एक) द्वारे दरमहा "रु. सोळाशे इतक्या" याऐवजी हा मजकूर घातला (दिनांक १२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. १९८७ चा अधिनियम २२, कलम २ (ख्) (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (दिनांक १२ ऑगस्ट, १९८७ व तेव्हापासून).

४. १९८७ चा अधिनियम २२, कलम २ (ख्) (दोन) (क्) अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी घातला (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

५. १९८७ चा अधिनियम २२ च्या कलम २ (ख्) (दोन) (ख्) द्वारे परंतुक गाळण्यात आले.

(ठ) "तेलक्षेत्र" याला 'तेलक्षेत्र (विनियमन व विकास) अधिनियम, १९४८' (१९४८ चा ५३) कलम ३-खंड (ङ) मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे अर्थ आहे;

(ड) "मळा" याला 'मळा कामगार अधिनियम, १९५१' (१९५१ चा ६९)-कलम २-खंड (ख्) मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे अर्थ आहे;

(ढ) "बंदर" याला 'भारतीय बंदर अधिनियम, १९०८' (१९०८ चा १५)-कलम ३-खंड (४) मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे अर्थ आहे;

(ण्) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(त्) "रेल्वे कंपनी" याला 'भारतीय रेल्वे अधिनियम, १८९०' (१८९० चा ९)-कलम ३-खंड (५) मध्ये त्याला नेमून दिल्याप्रमाणे अर्थ आहे;

(थ्) "सेवानिवृत्ति" याचा अर्थ नियत वयोमानामुळे नव्हे तर अन्यथा, कर्मचाऱ्याची नोकरी समाप्त होणे असा आहे;

[1][(द्) "नियत वयोमान" याचा कर्मचाऱ्याच्या संबंधातील अर्थ, जे वय झाल्यावर कर्मचाऱ्याला नोकरी सोडावी लागेल असे वय म्हणून सेवेच्या संविदेत किंवा शर्तीमध्ये निश्चित केले असेल अशा वयाला तो कर्मचारी पोचणे, असा आहे;]

(ध्) "वेतन" याचा अर्थ, कर्मचाऱ्याने कामावर असताना किंवा रजेवर असताना त्याच्या नोकरीच्या अटी व शर्तीनुसार अर्जित केलेले आणि त्याला रोख रकमेत दिले जाणारे किंवा प्रदेय असणारे परिलाभ असा आहे आणि त्यामध्ये, महागाई भत्त्याचा समावेश होतो, पण कोणताही बोनस, कमिशन, घरभाडे भत्ता, अतिकालिक वेतन व अन्य कोणताही भत्ता यांचा समावेश होत नाही.

[2][ २क. या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ,— **सलग सेवा.**

(१) जर एखाद्या कर्मचाऱ्याची एखाद्या कालावधीत अखंडित सेवा झालेली असेल तर, त्याची सलग सेवा झाली असे म्हटले जाईल—यामध्ये, जी सेवा त्याचे आजारपण, अपघात, रजा, रजेशिवाय कामावर अनुपस्थिती (त्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांचे नियंत्रण करणारे स्थायी आदेश, नियम किंवा विनियम यानुसार [3]* * * अशी अनुपस्थिती ही सेवेतील खंड म्हणून मानणारे आदेश ज्या संबंधात देण्यात आलेले असतील अशी अनुपस्थिती नव्हे) अपरिहार्य कामबंदी, संप किंवा टाळेबंदी किंवा संबंधित कर्मचाऱ्याचा काहीही दोष नसताना काम थांबवावे लागणे या कारणाने जी खंडित झाली असेल अशी सेवासुद्धा यात समाविष्ट आहे—मग अशी अखंडित किंवा खंडित सेवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या आधी झालेली असो किंवा नंतर झालेली असो;

(२) एखादा कर्मचारी (हंगामी आस्थापनेत कामावर लावलेला कर्मचारी नव्हे) पोटकलम (१) च्या अर्थानुसार, एका वर्षाच्या किंवा सहा महिन्यांच्या कोणत्याही कालावधीसाठी सलग सेवेत नसेल अशा बाबतीत,—

(क्) ज्या तारखेच्या संबंधात गणना करावयाची आहे अशा तारखेच्या लगतपूर्व बारा कॅलेंडर महिन्यांच्या काळात त्या कर्मचाऱ्याने, त्या नियोक्त्याच्या अखत्याराखाली—

(एक) खाणीमध्ये भूपृष्ठाखाली कामाला लावलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत किंवा जी आठवड्यातून सहा दिवसांपेक्षा कमी काळ काम करते अशा आस्थापनेत किमान एकशे नव्वद दिवस ; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, किमान दोनशे चाळीस दिवस,

प्रत्यक्षात काम केले असेल तर, उक्त एक वर्षाच्या कालावधीपर्यंत;

(ख्) ज्या तारखेच्या संबंधात गणना करावयाची आहे अशा तारखेच्या लगतपूर्व सहा कॅलेंडर महिन्यांच्या काळात त्या कर्मचाऱ्याने त्या नियोक्त्याच्या अखत्याराखाली—

(एक) खाणीमध्ये भूपृष्ठाखाली कामावर लावलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत, किंवा जी आठवड्यातून सहा दिवसांपेक्षा कमी काम करते अशा आस्थापनेत किमान पंच्याण्णव दिवस ; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, किमान एकशे वीस दिवस, प्रत्यक्षात काम केले असेल तर, उक्त सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत,

तो त्या नियोक्त्याच्या अखत्याराखाली सलग सेवेत असल्याचे मानण्यात येईल.

[**स्पष्टीकरण.**—खंड (२) च्या प्रयोजनार्थ, नियोक्त्याकडे कर्मचाऱ्याने प्रत्यक्षात केलेल्या कामाच्या दिवसांच्या संख्येत खालील दिवसांचा समावेश होईल—

(एक) करारानुसार अथवा औद्योगिक सेवायोजन (स्थायी आदेश) अधिनियम, १९४६ (१९४६ चा २०), किंवा औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (१९४७ चा १४),

---

१. १९८४ चा अधिनियम २५, कलम २ (ख्) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (१ जुलै, १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. १९८४ चा अधिनियम २६, कलम ४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले (११ फेब्रुवारी, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. १९८७ चा अधिनियम २२, कलम ३(क्) द्वारे गाळण्यात आले.

किंवा आस्थापनेला लागू असणारा अन्य कोणताही विधी, याअन्वये केलेल्या कोणत्याही स्थायी आदेशान्वये परवाना देण्यात आल्यानुसार ज्या दिवशी त्याला अपरिहार्य कामबंदी करण्यात आली असेल, ते दिवस ;

(दोन) आदल्या वर्षी अर्जित केलेल्या पूर्ण वेतनी रजेवर असेल, ते दिवस;

(तीन) त्याच्या नोकरीमुळे आणि त्या ओघात झालेल्या अपघातामुळे आलेल्या तात्पुरत्या विकलांगतेमुळे तो अनुपस्थित असेल, ते दिवस ;

(चार) महिलेच्या बाबतीत, ती प्रसूति रजेवर असेल तेव्हा तथापि, अशा प्रसूति रजेचा एकूण कालावधी बारा आठवड्यांहून अधिक असणार नाही.]

[(३) हंगामी आस्थापनेत कामावर लावलेला एखादा कर्मचारी, पोटकलम (१) च्या अर्थानुसार कोणत्याही एका वर्षाच्या किंवा सहा महिन्यांच्या कालावधीपर्यंत सलग सेवेत नसेल अशा बाबतीत, त्या कालावधीत त्या आस्थापनेचे काम जितके दिवस चालू होते त्यांपैकी किमान पंचाहत्तर टक्के दिवस जर त्या कर्मचाऱ्याने प्रत्यक्षात काम केले असेल तर तो तितका काळ त्या नियोक्त्याच्या अखत्याराखाली सलग सेवेत असल्याचे मानण्यात येईल. ]

**नियंत्रक प्राधिकारी.** ३. समुचित शासनाला अधिसूचनेद्वारे नियंत्रक प्राधिकारी म्हणून कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल व तो या अधिनियमाच्या अंमलबजावणीस जबाबदार असेल आणि वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी वेगवेगळे नियंत्रक प्राधिकारी नियुक्त करता येतील.

**उपदान देणे.** ४. (१) कर्मचाऱ्याने किमान पाच वर्षे सलग सेवा केल्यानंतर जेव्हा,—

(क) तो नियत वयोमानास पोचल्यामुळे, किंवा

(ख) त्याच्या सेवानिवृत्तीमुळे किंवा राजीनाम्यामुळे, किंवा

(ग) अपघात किंवा रोग या कारणाने तो मृत्यू पावल्यामुळे किंवा निःसमर्थ झाल्यामुळे,

त्याची नोकरी संपेल तेव्हा त्याला उपदान प्रदेय होईल :

परंतु, कोणत्याही कर्मचाऱ्याची नोकरी मृत्युमुळे किंवा निःसमर्थतेमुळे संपेल त्याबाबतीत, पाच वर्षांची सलग सेवा पूर्ण होण्याची आवश्यकता असणार नाही :

[1][परंतु आणखी असे की, कर्मचाऱ्याला मृत्यू आल्यास, त्याबाबतीत त्याला प्रदेय असणारे उपदान त्याच्या नामनिर्देशितीला किंवा नामनिर्देशन करण्यात आले नसल्यास, त्याच्या वारसांना, आणि जेथे असे कोणताही नामनिर्देशिती वा वारस अज्ञान असतील तेथे, अशा अज्ञानाचा हिस्सा, नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे ठेव म्हणून ठेवण्यात येईल व तो प्राधिकारी तो हिस्सा अशा अज्ञानाच्या लाभार्थ, अशा अज्ञानाला सज्ञानत्व प्राप्त होईपर्यंत, विहित करण्यात येईल अशा बँकेत वा अन्य वित्तीय संस्थत गुंतविल.]

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, 'निःसमर्थता' याचा अर्थ, ज्यामुळे अशी निःसमर्थता आली तो अपघात किंवा रोग होण्यापूर्वी कर्मचारी जे काम करण्यास समर्थ होता ते काम करण्यास त्याला असमर्थ करणारी अशी निःसमर्थता असा आहे.

(२) कर्मचाऱ्याला सेवेच्या प्रत्येक पूर्ण वर्षासाठी किंवा सहा महिन्यांपेक्षा अधिक अशा त्याच्या भागासाठी संबंधित कर्मचाऱ्याने लगतपूर्वी ज्या दराने वेतन घेतले त्यावर आधारलेल्या, पंधरा दिवसांच्या वेतनदराने नियोक्ता उपदान देईल :

परंतु, कामावारी दराच्या बोलीने लावलेल्या कर्मचाऱ्याच्या बाबतीत, त्याची नोकरी संपण्याच्या लगतपूर्वी तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये त्याने मिळवलेल्या एकूण वेतनाच्या सरासरीवरून त्याची रोजंदारी संगणित केली जाईल आणि, या प्रयोजनार्थ, कोणत्याही अतिकालिक कामाबद्दल दिलेले वेतन हिशेबात घेतले जाणार नाही :

परंतु आणखी असे की, [2][ज्याला हंगामी आस्थापनेमध्ये कामावर लावले असून त्याला वर्षभर अशाप्रकारे कामावर ठेवलेले नाही अशा] कर्मचाऱ्याच्या बाबतीत, नियोक्ता प्रत्येक हंगामाकाठी सात दिवसांच्या वेतनाच्या दराने उपदान देईल.

[3][**स्पष्टीकरण.**—मासिक दरावरील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, त्याने घेतलेल्या अंतिम मासिक वेतनाचा दर भागिले सव्वीस आणि येणारा भागाकार गुणिले पंधरा अशा रीतीने पंधरा दिवसांचे वेतन मोजण्यात येईल.

---

१. सन १९८७ चा अधिनियम २२, कलम ४ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (१२ ऑगस्ट, १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. सन १९८४ चा अधिनियम २५, कलम ३ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (१ जुलै, १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. १९८७ चा अधिनियम २२, कलम ४ (ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (दिनांक १२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

(३) कर्मचाऱ्याला प्रदेय असणारी उपदानाची रक्कम [1][पन्नास हजार रुपयांहून] अधिक असणार नाही.

(४) ज्या कर्मचाऱ्याला तो निःसमर्थ झाल्यावर कमी वेतनावर कामाला लावलेले असेल त्या कर्मचाऱ्याला प्रदेय असणारे उपदान संगणित करण्याच्या प्रयोजनार्थ, त्याच्या निःसमर्थतेपूर्वीच्या कालावधीमध्ये त्याने मिळवलेले वेतन हे त्या कालावधीत त्याला मिळालेले वेतन म्हणून समजले जाईल, आणि त्याच्या निःसमर्थतेनंतरच्या कालावधीचे वेतन म्हणजे असे कमी केलेले वेतन म्हणून समजले जाईल.

(५) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणताही लवादनिवाडा किंवा नियोक्त्याशी केलेला कोणताही करार किंवा संविदा याखाली अधिक फायदेशीर असेल ते उपदान मिळवण्याच्या कर्मचाऱ्याच्या हक्कास बाध येणार नाही.

(६) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) नियोक्त्याच्या मालकीच्या संपत्तीचे कोणतेही नुकसान किंवा हानी होण्यास किंवा तिचा विध्वंस होण्यास कारणीभूत होणाऱ्या कोणत्याही कृतीमुळे किंवा बुद्धिपुरस्सर अकृतीमुळे किंवा हयगयीमुळे ज्या कर्मचाऱ्याची नोकरी संपुष्टात आणली गेली असेल त्याच्या उपदानातून, याप्रमाणे झालेल्या नुकसानाच्या किंवा हानीच्या व्याप्तीएवढी रक्कम जप्त करण्यात येईल ;

(ख) कर्मचाऱ्याला प्रदेय असलेले उपदान,—

(एक) अशा कर्मचाऱ्याला त्याच्या दंगलखोर किंवा बेशिस्त वर्तनामुळे किंवा त्याने केलेल्या अन्य कोणत्याही हिंसक कृत्यामुळे नोकरीवरून काढून टाकलेले असल्यास, किंवा

(दोन) नैतिक अधःपतन अनुस्यूत असलेल्या कोणत्याही अपराधाला घटकभूत असणाऱ्या कोणत्याही कृतीबद्दल अशा कर्मचाऱ्याची नोकरी संपुष्टात आणलेली असून, असा अपराध तो कामावर असतानाच त्याने केलेला असेल तर,

[2][ संपूर्णतः किंवा अंशतः जप्त करता येईल. ]

[3][(७) शंका-निवारणार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येते की, कलम २-खंड (ङ) मध्ये निर्देशिलेल्या कर्मचाऱ्याची पोटकलम (१) चा खंड (क) किंवा खंड (ख) किंवा खंड (ग) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने नोकरी समाप्त होण्याच्या लगतपूर्वी किंवा तत्पूर्वी कोणत्याही वेळी त्याला,—

(एक) 'उपदान प्रदान (विशोधन) अधिनियम, १९८४' याच्या प्रारंभापूर्वी त्यांची नोकरी समाप्त झाली असेल अशा बाबतीत, दरमहा एक हजार रुपयांहून अधिक वेतन; आणि

(दोन) अशा प्रारंभानंतर त्याची नोकरी समाप्त झाली असेल अशा बाबतीत, दरमहा सोळाशे रुपयांहून अधिक वेतन,

मिळत होते असे असले तरी, त्या कर्मचाऱ्याला कलम २ खंड (ङ) च्या स्पष्टीकरणाच्या उपबंधानुसार निर्धारित करण्यात येईल असे उपदान प्रदेय असेल ].

[4][४क. (१) या संबंधात समुचित शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा दिनांकापासून, केंद्र शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील नियोक्ता किंवा आस्थापना या व्यतिरिक्त प्रत्येक नियोक्ता, पोटकलम (२)च्या उपबंधांच्या अधीनतेने, या अधिनियमान्वये उपदानापोटी प्रदान करावयाच्या त्याच्या दायित्वासाठी, भारताचे जीवन विमा महामंडळ अधिनियम, १९५६ (१९५६ चा ३१) अन्वये स्थापन झालेल्या जीवन विमा महामंडळाकडून विहित केलेल्या रीतीने वा अन्य कोणत्याही विहित केलेल्या रीतीने विमा मिळवील : अनिवार्य विमा.

परंतु निरनिराळ्या आस्थापना किंवा आस्थापनांचे वर्ग किंवा निरनिराळी क्षेत्रे यांसाठी निरनिराळे दिनांक निश्चित करता येतील.

(२) समुचित शासनाला, विहित करता येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, आपल्या कर्मचाऱ्यांसाठी यापूर्वीच मान्यताप्राप्त उपदान निधी ज्याने स्थापन केला आहे आणि जो अशी व्यवस्था चालू ठेवू इच्छितो अशा प्रत्येक नियोक्त्याला, तसेच पोटकलम (१) च्या उपबंधांन्वये विहित केलेल्या रीतीने मान्यताप्राप्त उपदान निधी स्थापन करणाऱ्या पाचशे किंवा अधिक व्यक्तींना नोकरीस ठेवणाऱ्या प्रत्येक नियोक्त्याला सूट देता येईल.

(३) या कलमाच्या उपबंधांच्या परिणामक अंमलबजावणीसाठी प्रत्येक नियोक्ता, विहित करण्यात येईल अशा कालावधीत, नियंत्रित प्राधिकरणाकडे विहित रीतीने आपल्या आस्थापनेची नोंदणी करवून घेईल आणि कोणत्याही नियोक्त्याची, त्याने पोटकलम (१) मधील विमा घेतला असल्याशिवाय किंवा

---

१. सन १९८७ चा अधिनियम २२, कलम ४ (ग) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. सन १९८४ चा अधिनियम २५, कलम ३ (ग) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केला (१ जुलै १९८४ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ३ (घ) द्वारे समाविष्ट करण्यात आला (१ जुलै १९८४ रोजी व तेव्हापासून).

४. १९८७ चा अधिनियम २२, कलम ५ द्वारे नवीन कलम घातले (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेला मान्यताप्राप्त उपदान निधी स्थापन केला असल्याशिवाय, या कलमान्वये नोंदणी केली जाणार नाही.

(४) समुचित शासनाला, अधिसूचनेद्वारे, या कलमाचे उपबंध परिणामक होण्यासाठी नियम करता येतील आणि अशा नियमांद्वारे मान्यताप्राप्त उपदान निधीच्या विश्वस्त मंडळाच्या रचनेसाठी आणि भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून किंवा पोटकलम (१) अन्वये ज्याच्याकडे विमा घेण्यात आला असेल अशा अन्य कोणत्याही विमाकाराकडून किंवा प्रकरणपरत्वे मान्यताप्राप्त उपदान निधीच्या विश्वस्त मंडळाकडून कर्मचाऱ्याला देय असलेल्या उपदानाच्या रकमेची नियंत्रक प्राधिकरणाकडून केल्या जाणाऱ्या वसुलीसाठी उपबंध करता येईल.

(५) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या विम्याच्या हप्त्याद्वारे किंवा पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या मान्यताप्राप्त उपदान निधीतील अंशदानाद्वारे कोणताही नियोक्ता कोणतेही प्रदान करण्यात कसूर करील तेव्हा तो नियंत्रक प्राधिकरणाकडे या अधिनियमान्वये देय असलेली उपदानाची रक्कम (विलंबित प्रदानांवरील व्याजासह--तसे कोणतेही व्याज असल्यास) भरण्यास दायी असेल.

(६) जो कोणीही पोटकलम ५ च्या उपबंधांचे व्यतिक्रमण करील तो दहा हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल अशा द्रव्यदंडाच्या आणि अपराध चालू राहिल्यास अपराध चालू असल्याच्या कालावधीत प्रत्येक दिवसासाठी एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा आणखी द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

[१][**स्पष्टीकरण.**---या कलमात "मान्यताप्राप्त उपदान निधी" या संज्ञेला, आयकर अधिनियम, १९६१, कलम २, खंड (५) मध्ये जो अर्थ आहे तोच अर्थ असेल.]

**सूट देण्याची शक्ती.** ५. [२][(१)] ज्या कोणत्याही आस्थापनेला, कारखान्याला, खाणीला, तेलक्षेत्राला, मळ्याला, बंदराला, रेल्वे कंपनीला किंवा दुकानाला हा अधिनियम लागू होतो त्यातील कर्मचाऱ्यांना या अधिनियमाखाली प्रदान केलेल्या लाभाहून कमी अनुकूल नसलेले असे उपदान किंवा निवृत्तिवेतनविषयक लाभ मिळतात असे समुचित शासनाचे मत असेल तर, समुचित शासन अधिसूचनेद्वारे व अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, अशा कोणत्याही आस्थापनेला, कारखान्याला, खाणीला, तेलक्षेत्राला, मळ्याला, बंदराला, रेल्वे कंपनीला किंवा दुकानाला या अधिनियमाच्या उपबंधांच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल.

[२][(२) जी कोणतीही आस्थापना, कारखाना, खाण, तेलक्षेत्र, मळा, बंदर, रेल्वे कंपनी किंवा दुकान यास हा अधिनियम लागू होतो त्यात कामावर लावलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्याला किंवा कर्मचाऱ्यांच्या वर्गाला या अधिनियमाखाली प्रदान केलेल्या लाभाहून कमी अनुकूल नसलेले असे उपदान किंवा निवृत्तिवेतनविषयक लाभ मिळतात असे समुचित शासनाचे मत असेल तर समुचित शासन अधिसूचनेद्वारे व त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, अशा कर्मचाऱ्याला किंवा कर्मचाऱ्यांच्या वर्गाला या अधिनियमाच्या उपबंधांच्या प्रवर्तनापासून सूट देऊ शकेल].

[३][(३) पोटकलम (१) अन्वये किंवा पोटकलम (२) अन्वये काढलेली अधिसूचना या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वीचा नसेल अशा भूतलक्षी दिनांकास काढता येईल, परंतु कोणत्याही व्यक्तीच्या हितसंबंधांवर बाधक परिणाम होईल अशा रीतीने कोणतीही अशी अधिसूचना काढली जाणार नाही].

**नामनिर्देशन.** ६. (१) ज्याने नोकरीचे एक वर्ष पूर्ण केलेले असेल त्या प्रत्येक कर्मचाऱ्याला विहित करण्यात येईल अशा मुदतीत, अशा नमुन्यात व अशा रीतीने कलम ४-पोटकलम (१) च्या दुसऱ्या परंतुकाच्या प्रयोजनार्थ नामनिर्देशन करावे लागेल.

(२) नामनिर्देशन करताना कर्मचाऱ्याला या अधिनियमाखाली त्याला प्रदेय असलेली उपदानाची रक्कम एकापेक्षा अधिक नामनिर्देशितींमध्ये वाटून देता येईल.

(३) नामनिर्देशन करण्याच्या वेळेस जर कर्मचाऱ्याचे कुटुंब असेल तर, त्याच्या एका किंवा अधिक कुटुंबियांच्या नावाने नामनिर्देशन करावे लागेल, आणि अशा कर्मचाऱ्याने त्याची कुटुंबीय नसलेल्या व्यक्तीच्या नावाने केलेले नामनिर्देशन शून्य असेल.

(४) नामनिर्देशन करण्याच्या वेळेस कर्मचाऱ्याचे कुटुंब नसेल तर, त्याला कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावाने नामनिर्देशन करता येईल, मात्र जर मागाहून तो कर्मचारी कुटुंबवान झाला तर, असे नामनिर्देशन तात्काळ विधिबाह्य होईल आणि विहित करण्यात येईल अशा मुदतीत कर्मचाऱ्याला आपल्या एका किंवा अधिक कुटुंबियांच्या नावाने नवीन नामनिर्देशन करावे लागेल.

(५) कर्मचाऱ्याचा नामनिर्देशनामध्ये फेरबदल करण्याचा उद्देश असल्यास, आपल्या नियोक्त्याला विहित असेल अशा नमुन्यात व अशा पद्धतीने आपल्या उद्देशाची लेखी नोटीस देऊन त्या कर्मचाऱ्याला कोणत्याही वेळी पोटकलम (३) व (४) च्या उपबंधांच्या अधीनतेने नामनिर्देशनामध्ये फेरबदल करता येईल.

---

१. १९८७ चा अधिनियम २२ कलम ५ द्वारे पोटकलम (६) नंतर हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. १९८४ चा अधिनियम २६ कलम ५ द्वारे कलम ५ ला कलम "५ (१)" असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पोटकलम (२) समाविष्ट करण्यात आले (१८ मे १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. १९८७ चा अधिनियम २२ च्या कलम ६ अन्वये नवीन पोटकलम घातले (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

(६) नामनिर्देशिती कर्मचाऱ्याच्या अगोदर मृत्यू पावल्यास नामनिर्देशितीचा हितसंबंध कर्मचाऱ्याकडे प्रत्यावर्तित होईल व त्या कर्मचाऱ्याला अशा हितसंबंधांच्या बाबतीत विहित नमुन्यामध्ये नवीन नामनिर्देशन करावे लागेल.

(७) प्रत्येक नामनिर्देशन किंवा नवीन नामनिर्देशन किंवा, प्रकरणपरत्वे, फेरबदल केलेले नामनिर्देशन कर्मचाऱ्याला आपल्या नियोक्त्याकडे पाठवावे लागेल व त्याला ते आपल्या ताब्यात सुरक्षित ठेवावे लागेल.

७. (१) या अधिनियमाखाली उपदानाची रक्कम मिळण्यास पात्र असणारी प्रत्येक व्यक्ती किंवा तिच्या वतीने काम चालविण्यासाठी तिने लेखी प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती यांना अशा उपदानाची रक्कम मिळण्यासाठी विहित करण्यात येईल अशा मुदतीत व अशा नमुन्यामध्ये नियोक्त्याकडे लेखी अर्ज पाठवावा लागेल. उपदानाच्या रकमेचे निर्धारण.

(२) उपदान प्रदेय झाले की, नियोक्ता उपदानाची रक्कम निर्धारित करील—मग पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेला अर्ज करण्यात आलेला असो वा नसो—आणि ज्या व्यक्तीला उपदान प्रदेय असेल तिला, तसेच नियंत्रक प्राधिकाऱ्यालाही अशी निर्धारित केलेली उपदानाची रक्कम विनिर्दिष्ट करणारी लेखी नोटीस देईल.

[१][(३) उत्पादन जिला देय असेल त्या व्यक्तीला नियोक्ता उपदानाची रक्कम ती देय झाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसांच्या आत देण्याची व्यवस्था करील.

(३क) पोटकलम (३) अन्वये देय असलेल्या उपदानाची रक्कम नियोक्त्याकडून कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत दिली गेली नाही तर, नियोक्ता, ज्या दिनांकास उपदान देय होते त्या दिनांकापासून ते दिल्याच्या दिनांकापर्यंत केंद्र शासनाकडून दीर्घकालीन ठेवींवर वेळोवेळी अधिसूचित केलेल्या दरापेक्षा अधिक नसेल अशा दराने, ते शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्यानुसार सरळ व्याज देईल:

परंतु, प्रदानातील विलंब हा कर्मचाऱ्यांच्या दोषामुळे असेल आणि या कारणावरून नियोक्त्याने नियंत्रक प्राधिकरणाकडून विलंबित प्रदानासाठी लेखी परवानगी मिळविली असेल तर असे कोणतेही व्याज देय असणार नाही.]

(४) (क) या अधिनियमाखाली कर्मचाऱ्याला प्रदेय असणाऱ्या उपदानाच्या रकमेबाबत अथवा उपदानाची रक्कम मिळण्याबाबतची किंवा त्याच्या संबंधातील कर्मचाऱ्याची कोणतीही हक्कमागणी अनुज्ञेय आहे किंवा कसे याबाबत अथवा उपदान मिळवण्यास हक्कदार असणाऱ्या व्यक्तीबाबत कोणताही तंटा उपस्थित झाल्यास, नियोक्ता उपदान म्हणून जितकी रक्कम त्याच्याकडून प्रदेय असल्याचे त्याला मान्य असेल तितकी रक्कम नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे जमा करील.

[२] * * * * *

[३][(ख्) खंड (क्) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीच्या किंवा बाबींच्या संबंधात तंटा उपस्थित झाला असेल अशा बाबतीत, नियोक्त्याला किंवा कर्मचाऱ्याला किंवा तंटा उपस्थित करणाऱ्या इतर कोणत्याही व्यक्तीला त्या तंटयाचा निर्णय करण्यासाठी नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.]

[४][[३][(ग्)] योग्य ती चौकशी केल्यानंतर आणि तंटयातील पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर नियंत्रक प्राधिकारी, तंटयातील बाब किंवा बाबी यांचा निर्णय करील आणि जर अशा चौकशीअंती त्या कर्मचाऱ्याला कोणतीही रक्कम प्रदेय असल्याचे आढळून आले तर, नियंत्रक प्राधिकारी, अशी रक्कम किंवा, प्रकरणपरत्वे, नियोक्त्याने यापूर्वीच जमा केलेली रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम त्या कर्मचाऱ्याला देण्याबाबत त्या नियोक्त्याला निदेश देईल.]

[३][(घ्)] नियंत्रक प्राधिकारी नियोक्त्याने जमा केलेली रक्कम व त्याने काही जास्तीची रक्कम जमा केलेली असल्यास तीसुद्धा, त्या रकमेला हक्कदार असणाऱ्या व्यक्तीला देईल.

[३][(ङ्)] खंड (क्) खाली रक्कम जमा करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, नियंत्रक प्राधिकारी ती जमा रक्कम—

(एक) अर्जदार हाच कर्मचारी असेल तर, त्याला देईल; किंवा

(दोन) अर्जदार हा कर्मचारी नसेल त्या बाबतीत, जर उपदानाची रक्कम मिळण्याच्या अर्जदाराच्या हक्काबाबत कोणताही तंटा नाही अशी नियंत्रक प्राधिकाऱ्याची खात्री पटली तर, कर्मचाऱ्याच्या [५][नामनिर्देशितीला किंवा, प्रकरणपरत्वे, अशा नामनिर्देशितीच्या पालकाला] किंवा कर्मचाऱ्याच्या वारसदाराला देईल.

---

१. १९८७ चा अधिनियम २२ कलम ७ अन्वये मूळ पोटकलम (३) ऐवजी घालण्यात आले (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. १९८४ चा अधिनियम २५, कलम ४ (क्) (एक) द्वारे स्पष्टीकरण वगळण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ (क्) (दोन) द्वारे खंड (ख्), (ग्) व (घ्) यांना अनुक्रमे खंड (ग्), (घ्) व (ङ्) असे नवीन क्रमांक देण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ (क्) (तीन) द्वारे नवीन खंड (ग्) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला (१ जुलै १९८४ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ४ (चार) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला. (१ जुलै १९८४ रोजी व तेव्हापासून).

(५) पोटकलम (४) खालील चौकशी चालवण्याच्या प्रयोजनार्थ, नियंत्रक प्राधिकाऱ्याला पुढील बाबतीत 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली दावा चालवताना न्यायालयाकडे निहित असलेल्या शक्ती असतील, त्या बाबी अशा :—

(क्) कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहण्यास भाग पाडणे किंवा तिची शपथेवर तपासणी करणे;

(ख्) दस्तऐवज प्रकट करण्यास व ते हजर करण्यास भाग पाडणे;

(ग्) प्रतिज्ञालेखावरून पुरावा स्वीकारणे;

(घ्) साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे.

(६) या कलमाखालील कोणतीही चौकशी म्हणजे 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) कलमे १९३ व २२८ यांच्या अर्थानुसार आणि कलम १९६ च्या प्रयोजनार्थ न्यायिक कार्यवाही असेल.

(७) पोटकलम (४) खालील आदेशामुळे नाराज झालेल्या कोणत्याही व्यक्तीला आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत समुचित शासनाकडे किंवा समुचित शासन या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा अन्य प्राधिकरणाकडे अपील करता येईल :

परंतु, पुरेशा कारणामुळे अपिलकर्ता उक्त साठ दिवसांच्या कालावधीमध्ये अपील दाखल करू शकला नाही अशी जर समुचित शासनाची किंवा, प्रकरणपरत्वे, अपील प्राधिकरणाची खात्री पटली तर, त्याला उक्त कालावधी आणखी साठ दिवसांनी वाढवता येईल.

[1][परंतु आणखी असे की, नियोक्त्याला अपील करावयाचे असल्यास, पोटकलम (४) अन्वये जमा करणे आवश्यक असलेली उपदानाच्या रकमेइतकी रक्कम अपीलकर्त्याने नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे जमा केली आहे अशा आशयाचे नियंत्रक प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अपीलकर्त्याने सादर केल्याशिवाय किंवा त्याने अपील प्राधिकरणाकडे अशी रक्कम जमा केल्याशिवाय, त्याने केलेले कोणतेही अपील दाखल करून घेण्यात येणार नाही.]

(८) अपिलातील पक्षकारांना आपापले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देऊन नंतर समुचित शासनाला किंवा, प्रकरणपरत्वे, अपील प्राधिकरणाला नियंत्रक प्राधिकाऱ्याचा निर्णय कायम करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल किंवा तो फिरवता येईल.

**निरीक्षक.** [2][७क. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी समुचित शासनाला, स्वत:ला योग्य वाटतील तितके निरीक्षक, अधिसूचनेद्वारे नियुक्त करता येतील.

(२) समुचित शासनाला सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणते क्षेत्र अशा प्रकारे नियुक्त केलेल्या निरीक्षकाच्या अखत्यारित असेल ते निश्चित करता येईल आणि एकाच क्षेत्रासाठी दोन किंवा अधिक निरीक्षक नियुक्त केलेले असतील अशा बाबतीत, या अधिनियमाअन्वये त्यांनी पार पाडावयाच्या कामाचे वितरण किंवा वाटप करण्यासाठीसुद्धा अशा आदेशाद्वारे उपबंध करण्यात येतील.

(३) प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**निरीक्षकांच्या शक्ती.** ७ख. (१) समुचित शासनाने या बाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने निरीक्षकाला, या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचे किंवा त्याखाली कोणतीही सूट दिलेली असल्यास ती संबंधीच्या शर्तींचे पालन करण्यात आले आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्तींचा वापर करता येईल, त्या शक्ती अशा :—

(क्) त्याला आवश्यक वाटेल अशी माहिती सादर करण्यास नियोक्त्याला फर्मावणे;

(ख्) हा अधिनियम ज्यास लागू आहे असा कोणताही कारखाना, खाण, तेलक्षेत्र, मळा, बंदर, रेल्वे कंपनी, दुकान किंवा इतर आस्थापना यांच्या वास्तुमध्ये किंवा त्यातील कोणत्याही जागेत या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये ठेवणे किंवा प्रदर्शित करणे आवश्यक असेल अशी अथवा कोणत्याही व्यक्तीच्या नोकरीच्या किंवा कर्मचाऱ्यांना उपदान देण्याच्या संबंधात, अन्यथा ठेवलेली किंवा प्रदर्शित केलेली अशी कोणतीही नोंदवही, अभिलेख किंवा नोटीस किंवा इतर दस्तऐवज यांची तपासणी करण्यासाठी स्वत:ला योग्य वाटतील असे कोणी मदतनीस असल्यास— ते मदतनीस म्हणजे शासनाच्या अगर कोणत्याही स्थानिक किंवा सार्वजनिक प्राधिकरणाच्या सेवेतील व्यक्ती असल्या पाहिजेत—त्यांच्यासह कोणत्याही वाजवी वेळी प्रवेश करून तेथे पाहणी करणे, आणि असे दस्तऐवज निरीक्षणासाठी सादर करण्यास फर्मावणे;

(ग्) नियोक्त्याची किंवा जी व्यक्ती अशा वास्तुत किंवा जागेत आपणास आढळून येईल आणि जी तेथे कामावर लावलेला कर्मचारी आहे असे मानण्याला आपणास वाजवी कारण असेल

---

१. १९८४ चा अधिनियम २५ कलम ४ (ख्) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले (१८ मे १९८४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे ही कलमे समाविष्ट करण्यात आली (१ जुलै १९८४ रोजी व तेव्हापासून).

अशा व्यक्तीची उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी संबद्ध अशा बाबींच्या संबंधात साक्ष-तपासणी करणे;

(घ) त्याला संबद्ध वाटेल अशी कोणतीही नोंदवही, अभिलेख, नोटीस किंवा अन्य दस्तऐवज याच्या नकला करून घेणे किंवा त्यामधील उतारे घेणे आणि या अधिनियमाखालील कोणताही अपराध कोणत्याही नियोक्त्याने केला आहे असे मानण्यास स्वत:ला वाजवी कारण असेल अशा बाबतीत, त्या अपराधाशी संबद्ध आहे असे त्याला स्वत:ला वाटेल अशी नोंदवही, अभिलेख, नोटीस किंवा अन्य दस्तऐवज यांची त्याला योग्य वाटेल अशा सहाय्यानिशी झडती घेऊन त्याचे अभिग्रहण करणे;

(ङ) विहित करण्यात येतील अशा इतर शक्ती वापरणे.

(२) पोटकलम (१) अन्वये एखाद्या निरीक्षकाने कोणतीही नोंदवही, अभिलेख, नोटीस किंवा अन्य दस्तऐवज सादर करण्यास ज्या व्यक्तीला फर्मावले असेल अशी कोणतीही व्यक्ती, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५) याची कलमे १७५ व १७६ यांच्या अर्थानुसार तसे करण्यास कायद्याने बांधलेली आहे असे मानण्यात येईल.

(३) 'फौजदारी प्रक्रिया संहिता' (१९७४ चा २) याचे उपबंध, त्या संहितेच्या कलम ९४ खाली काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकारान्वये घेतलेल्या कोणत्याही झडतीला किंवा अभिग्रहणाला जसे लागू होतात तसे ते या कलमाखाली घेतलेल्या कोणत्याही झडतीला किंवा अभिग्रहणाला शक्य असेल तितपत लागू होतील.]

८. जर या अधिनियमाखाली प्रदेय असलेली उपदानाची रक्कम नियोक्त्याने तिला हक्कदार असणाऱ्या व्यक्तीला विहित मुदतीत दिली नाही तर, नाराज झालेल्या व्यक्तीने या बाबतीत नियंत्रक प्राधिकाऱ्याकडे केलेल्या अर्जावरून नियंत्रक प्राधिकारी जिल्हाधिकाऱ्याकडे त्या रकमेचे एक प्रमाणपत्र देईल आणि जिल्हाधिकारी ती रक्कम, विहित मुदत संपल्याच्या दिनांकापासून [१][केंद्र शासन, अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा दराने] चक्रवाढ व्याजासह, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करील आणि त्या रकमेला हक्कदार असणा-या व्यक्तीला ती देईल. **उपदानाची वसुली.**

[२][परंतु या कलमान्वये प्रमाणपत्र देण्यापूर्वी नियंत्रक प्राधिकारी असे प्रमाणपत्र देण्यासंबंधातील कारण दाखविण्याची नियोक्त्याला वाजवी संधी देईल :

परंतु आणखी असे की, या कलमान्वये देय असलेली व्याजाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत या अधिनियमान्वये देय असलेल्या उपदानाच्या रकमेहून अधिक असणार नाही.]

९. (१) जो कोणी या अधिनियमाखाली त्याने स्वत: करावयाचे कोणतेही प्रदान टाळण्यासाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीने असे प्रदान टाळावे म्हणून जाणीवपूर्वक कोणतेही खोटे निवेदन किंवा खोटे अभिवेदन करील किंवा करवील तो, सहा महिनेपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा [३][दहा हजार] रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल. **शास्ती.**

(२) जो नियोक्ता या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे अथवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा काढलेल्या आदेशाचे व्यतिक्रमण करील किंवा त्याचे पालन करण्यात कसूर करील तो, [४][" तीन महिन्यांपेक्षा कमी नाही परंतु एक वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास अथवा दहा हजार रुपयांपेक्षा कमी नाही परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल "] इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल :

परंतु, जेव्हा असा अपराध या अधिनियमाखाली प्रदेय असलेले कोणतेही उपदान न देण्याशी संबंधित असेल तेव्हा, नियोक्ता [५][" सहा महिन्यापेक्षा कमी नाही परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल "] इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र होईल—मात्र कमी मुदतीच्या कारावासाने किंवा द्रव्यदंड लादून न्यायदानाचा हेतू सफल होईल असे अपराधाची संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयाचे मत असेल तर गोष्ट अलाहिदा, परंतु तव्हा न्यायालयाला त्यामागील कारणांची लेखी नोंद करावी लागेल.

---

१. १९८७ चा अधिनियम २२, कलम ८(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले. (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ८(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला. (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ९(क) अन्वये बदल केला. (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ९(ख) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला. (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ९(ख) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला. (१२ ऑगस्ट १९८७ रोजी व तेव्हापासून).

विवक्षित प्रकरणी नियोक्त्यास दायित्वातून सूट. १०. जेव्हा एखाद्या नियोक्त्यावर या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या एखाद्या अपराधाचा आरोप ठेवण्यात आला असेल तेव्हा, जी व्यक्ती प्रत्यक्ष अपराधी असल्याबद्दल त्याचा आरोप असेल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीला आरोपाच्या सुनावणीसाठी नियत वेळी न्यायालयापुढे आणवण्याबाबत त्याने रीतसर तक्रार केल्यावर आणि तसे करण्याचा आपला उद्देश असल्याविषयी त्याने तक्रारदाराला किमान तीन पूर्ण दिवसांची लेखी नोटीस दिल्यावर, तसे करण्याचा त्याला हक्क असेल, आणि अपराध घडल्याचे शाबीत झाल्यानंतर, जर नियोक्त्याने,—

(क) या अधिनियमाची अंमलबजावणी व्हावी यासाठी आपण यथायोग्य तत्परता दाखवली होती, आणि

(ख) उक्त अन्य व्यक्तीने प्रस्तुत अपराध केला हे आपणास माहीत नव्हते किंवा त्याला आपली संमती अगर मूकानुमती नव्हती,

असे न्यायालयाची खात्री पटेल अशा तऱ्हेने शाबीत केले तर, त्या अन्य व्यक्तीला त्या अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात येईल आणि ती अन्य व्यक्ती म्हणजे जणू काही नियोक्ता असावा त्याप्रमाणे तशाच शिक्षेस ती पात्र होईल आणि अशा अपराधाबाबत या अधिनियमाखालील कोणत्याही दायित्वामधून नियोक्त्याला मुक्त केले जाईल :

परंतु, नियोक्ता पूर्वोक्ताप्रमाणे शाबीत करू पाहत असता, त्याची शपथेवर तपासणी करता येईल आणि त्याच्या व स्वत:च्या पुष्टयर्थ तो ज्या कोणत्याही साक्षीदाराला बोलावील त्याचा साक्षीपुरावा हा, जी व्यक्ती प्रत्यक्ष अपराधी असल्याचा त्याचा आरोप असेल त्या व्यक्तीच्या वतीने आणि फिर्यादीद्वारे उलटतपासणी होण्यास पात्र असेल :

परंतु आणखी असे की, जी व्यक्ती प्रत्यक्ष अपराधी आहे असा नियोक्त्याचा आरोप असेल ती व्यक्ती आरोपाच्या सुनावणीसाठी नियत केलेल्या वेळी न्यायालयापुढे आणता आली नाही तर, न्यायालय जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या कालावधीपर्यंत वेळोवेळी सुनावणी तहकूब करील आणि उक्त कालावधीच्या अखेरपर्यंतही जर प्रत्यक्ष अपराधी म्हणून आरोप असलेल्या व्यक्तीला न्यायालयापुढे आणता आले नाही तर, न्यायालय नियोक्त्याविरुद्ध असलेल्या आरोपाची सुनावणी सुरू करील आणि जर अपराध शाबीत झाला तर नियोक्त्याला दोषी ठरवील.

अपराधांची दखल घेणे. ११. (१) समुचित शासनाने किंवा त्याच्या प्राधिकारान्वये कोणीही तक्रार केल्याखेरीज कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही :

परंतु, विहित मुदत संपल्यापासून सहा महिन्यांच्या आत उपदानाची रक्कम देण्यात आली नाही किंवा तिची वसुली करण्यात आली नाही तर, समुचित शासन नियंत्रक प्राधिकाऱ्याला नियोक्त्याविरुद्ध तक्रार करण्यास प्राधिकृत करील व त्यानंतर अशा प्राधिकृतीच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत नियंत्रक प्राधिकारी अपराधाची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे अशी तक्रार करील.

(२) इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्ग दंडाधिकारी यांच्या न्यायालयाहून कनिष्ठ असे कोणतेही न्यायालय या अधिनियमाखाली शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करणार नाही.

सद्भावपूर्वक केलेल्या कारवाईस संरक्षण. १२. हा अधिनियम अथवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा काढलेला आदेश याखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल नियंत्रक प्राधिकारी किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही होऊ शकणार नाही.

उपदानास संरक्षण. १३. या अधिनियमाखाली प्रदेय असलेले कोणतेही उपदान [१][आणि कलम ५ खाली सूट दिलेल्या कोणत्याही आस्थापनेत, कारखान्यात, खाणीत, तेलक्षेत्रात, मळचात, बंदरात, रेल्वे कंपनीत किंवा दुकानात कामावर लावलेल्या कर्मचाऱ्याला प्रदेय असलेले कोणतेही उपदान] कोणत्याही दिवाणी, महसूल किंवा फौजदारी न्यायालयाने काढलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याची किंवा आदेशाची अंमलबजाणी करताना जप्तीस पात्र असणार नाही.

अन्य अधिनियमिती, इत्यादींहून हा अधिनियम अधिभावी ठरणे. १४. या अधिनियमाचे उपबंध किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम हे या अधिनियमाखेरीज अन्य कोणत्याही अधिनियमितीमध्ये अथवा या अधिनियमाखेरीज अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या आधारे परिणामक होणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये किंवा संविदेमध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी परिणामक होतील.

नियम करण्याची शक्ती. १५. (१) या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी समुचित शासनाला अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

---

१. १९८४ चा अधिनियम २५, कलम ६ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला (१ जुलै १९८४ रोजी व तेव्हापासून).

(२) केंद्र शासनाने या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## THE PAYMENT OF GRATUITY ACT, 1972

## उपदान प्रदान अधिनियम, १९७२

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| aggrieved person | नाराज झालेली व्यक्ती | [S. 8] |
| appropriate Government | समुचित शासन | [S. 2 (*a*)] |
| chief executive officer | मुख्य कार्यकारी अधिकारी | [S. 2 (*f*) (*ii*)] |
| cognizance | दखल | [S. 11 (1)] |
| completed year of service | सेवेचे पूर्ण वर्ष | [S. 2 (*b*)] |
| compulsary insurance | अनिवार्य विमा | [S. 4*A* (1)] |
| continu us service | सलग सेवा | [S. 2 (*c*)] |
| controlling authority | नियंत्रक प्राधिकारी | [S. 2 (*d*)] |
| factory | कारखाना | [S. 2 (*g*)] |
| gratuity | उपदान | [S. 1 (1)] |
| local authority | स्थानिक प्राधिकरण | [S. 2 (*f*) (*ii*)] |
| longterm deposit | दीर्घकालीन ठेव | [S. 7 (3*A*)] |
| major port | मोठे बंदर | [S. 2 (*i*)] |
| managing director | व्यवस्थापन संचालक | [S. 2 (*f*) (*iii*)] |
| manual work | अंगमेहनतीचे काम | [S. 2 (*e*)] |
| mine | खाण | [S. 2 (*j*)] |
| oil field | तेलक्षेत्र | [S. 2 (*l*)] |
| overtime wages | अतिकालिक वेतन | [S. 2 (*s*)] |
| penalties | शास्ती | [S. 9 (1)] |
| pensionery benefits | निवृत्तिवेतनविषयक लाभ | [S. 5 (1)] |
| piece-rated employee | कामावारी दराच्या बोलीने लावलेला कर्मचारी. | [S 4 (2)] |
| plantation | मळा | [S. 1 (3) (*a*) |
| superannuation | नियतवयोमान | [S. 2 (*r*)] |

# उपदान प्रदान अधिनियम, १९७२

# THE PAYMENT OF GRATUITY ACT, 1972

## मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अतिकालिक वेतन | overtime wages | [क. 2 (ध)] |
| अनिवार्य विमा | compulsary insurance | [क. 4 क(1)] |
| अंगमेहनतीचे काम | manual work | [क. 2 (ङ)] |
| उपदान | gratuity | [क. 1 (1)] |
| कामावारी दराच्या बोलीने लावलेला कर्मचारी | piece-rated employee | [क. 4 (2)] |
| कारखाना | factory | [क. 2 (छ)] |
| खाण | mine | [क. 2 (ञ)] |
| तेलक्षेत्र | oil field | [क. 2 (*l*)] |
| दखल | cognizance | [क. 11(1)] |
| दीर्घकालीन ठेव | long-term deposit | [क. 7 (3क)] |
| नाराज झालेली व्यक्ती | aggrieved person | [क. 8] |
| नियंत्रक प्राधिकारी | controlling authority | [क. 2 (घ)] |
| नियत वयोमान | superannuation | [क. 2 (4)] |
| निवृत्तीवेतनविषयक लाभ | pensionary benefits | [क. 5 (1)] |
| मळा | plantation | [क. 1 (3) (क)] |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | chief executive officer | [क. 2 (च) (*ii*)] |
| मोठे बंदर | major port | [क. 2 (*i*)] |
| व्यवस्थापन संचालक | managing director | [क. 2 (च) (*iii*)] |
| शास्ती | penalties | [क. 9 (9)] |
| सलग सेवा | continuous service | [क. 2 (ग)] |
| समुचित शासन | appropriate government | [क. 2 (क)] |
| सेवेचे पूर्ण वर्ष | completed year of service | [क. 2 (ख)] |
| स्थानिक प्राधिकरण | local authority | [क. 2 (च) (*ii*)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई